


# गावाजवळ वन्यप्राणी दिसल्यास

बरेच वेळा वन्यप्राणी (वाघ - बिबट ) आपल्या गावाजवळ, शेतात, नदी - नाल्याच्या काठावर येतात. आपण त्यावेळी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे असते. खास करून वाघीण पिल्ल्यासह गावाजवळ दिसत असल्यास अधिक दक्षता घेणे गरजेचे ठरते. वाघ - बिबट दिसला तर मोबाईलवरून ती बातमी लवकरच सर्वदूर पसरते. लोकांचे लोंढे गावाजवळ येऊन प्राण्याचे दर्शन घ्यायचा प्रयत्न करतात. परिणामी मोठा गोंधळ होतो. प्राणीही बिचकून जातो व घाबरून हल्ला केल्याच्या घटना घडतात.

## काळजी कशी घ्याल ?

- गावाजवळील जंगलात, शेतात, गावाच्या हद्दीत वाघ - बिबट आल्सास तो बघण्यासाठी गर्दी करू नये.
- वनविभागाचे कर्मचारी त्याला तेथून घालवून देत असल्यास त्यांना दूर राहून सहकार्य करावे.
- प्राणी दिसल्यावर त्याला त्रास देऊ नये. दगड मारून पळवून लावण्याचा प्रयत्न करू नये. अथवा मोबाईलने फोटो काढण्याचा प्रयत्नही करू नये. गावात पीआरटी असल्यास त्यांना मदतसाठी बोलवावे.
- उघडयावर शौचाला जाऊ नये.
- पहाटे व सायंकाळी अंधार पडल्यावर गावाबाहेर, शेतात जाण्याचे काही काळ टाळावे.
- वाघीण पिल्ल्यासह ज्या भागात दिसत असेल तर विनाकारण त्या परिसरात जाऊ नये.
- जवळच्या वनरक्षकाला, चौकीदाराला फोन करून कल्पना द्यावी.
- गावाजवळ कचरा उघडयावर बाहेर टाकू नये. या कचऱ्याजवळ कुत्री येतात व त्यांना खायला बिबट गावाजवळ येतो.

आपले जीवन अमूल्य आहे. योग्य ती काळजी घेतली तर वन्यप्राण्यांपासून आपला बचाव होऊ शकतो. जंगलापासून आपल्याला खुप गोष्टी मिळतात. जंगलासोबतच राहून आपले सहजीवन जगण्याचा प्रयत्न करायचा आहे.

**दक्षता घ्या... काळजी घ्या... जीवन अमुल्य आहे..!**